Telegram:"Dnyanteerth"

**Swami Ramanand Teerth**
**Marathwada University**

*"Dnyanteerth", Vishnupuri,*
**Nanded – 431 606 (M.S.)**

तार: " ज्ञानतीर्थ "

**स्वामी रामानंद तीर्थ**
**मराठवाडा विद्यापीठ**

*"ज्ञानतीर्थ", विष्णुपुरी,*
**नांदेड — ४३१ ६०६ (महाराष्ट्र)**

संदर्भ : परीक्षा/प.नि/२०१३–१४/१०५६ दिनांक : २४/०६/२०१४

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व सलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ

विषय : शैक्षणिक वर्ष २०१४–१५ पासुन नविन परीक्षा पध्दती लागु करणे बाबत....

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, मा. विद्यापरीषदेच्या दिनांक ३० एप्रिल २०१४ रोजीच्या बैठकी मधील विषय क्र. २६/३२–२०१४ नुसार शैक्षणीक वर्ष २०१४ - २०१५ पासुन बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. बी.बी.ए. या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी नवीन परीक्षा पध्दतीस मा.विद्यापरीषदेने मान्यता प्रदान केलेली आहे. सदरील बैठकीतील ठराव खालील प्रमाणे आहेत;

१) सध्या अस्तित्वात असलेली बहुपर्यायी परीक्षा पध्दती शैक्षणिक वर्ष २०१४–१५ पासुन प्रथम वर्षासाठी बंद करण्यात येत आहे.
२) नवीन परीक्षापध्दती हिवाळी २०१४ ( शैक्षणिक वर्ष २०१४–१५) पासून लागू करण्यात यावी.
३) सदर परीक्षेचा गुणाचा पॅटर्न ३०+१०+१० ( दिर्घोत्तरी स्वरुपाचे ३० गुण + एम.सी. क्यू. १० गुण + अंतर्गत १० गुण ) असा असेल.
४) उत्तीर्ण होण्यासाठी (३०+१० एकूण ४० गुणा पैकी १६ गुण तसे १०गुणापैकी ०४ गुण मिळणे आवश्यक राहिल)
५) एम.सी. क्यू. साठी निगेटीव्ह मार्कींग राहिल. एकूण चार चूकांसाठी ०१ गुण कमी करण्यात येईल.
६) पहिला अर्धातास एम. सी. क्यू. परीक्षेसाठी राखीव ठेवण्यात यावा व पुढील दोन तास दिर्घोत्तरी प्रश्नांसाठी राखीव ठेवण्यात यावे. परीक्षा सुरु झाल्यावर दहा मिनीटांनंतर परीक्षा दालनात प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यास एम. सी. क्यू उत्तर पत्रिका

....२

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION**

Phone: (02462) 229542
Fax : (02462) 229574
Website: www.srtmun.ac.in
E-mail: bos.srtmun@gmail.com

## परिपत्रक

सर्व संबधितांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, **दिनांक १२ मे २०१६** रोजी आयोजित विद्या परिषदेच्या बैठकीतील **विषय क्र.२९/३६–२०१६** या ठरावाच्या अनुशंगाने प्रस्तुत विद्यापीठाचे विज्ञान विद्या शाखेतिल पदवी प्रथम वर्ष अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासुन CBCS Pattern लागु करण्याकरिता मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

तरी विज्ञान विद्या शाखेतिल पदवी प्रथम वर्ष CBCS Pattern अभ्यासक्रम प्रस्तुत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

''ज्ञानतीर्थ'' परिसर )(
विष्णुपूरी, नांदेड. )(
जा.क्र.शैक्षणिक/०१/CBCS Pattern )( स्वा/–
/२०१६–२०१७/७७ )( **संचालक**
दिनांक : ११/०५/२०१६ )( महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :**

१) प्राचार्य, सर्व संबंधित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ.
३) कुलसचिव, ( निवडणूक व सभा कक्ष ) यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग व पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ. (सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारित करावे. )

Telegram:"Dnyanteerth"
**Swami Ramanand Teerth**
**Marathwada University**
*"Dnyanteerth", Vishnupuri,*
**Nanded – 431 606 (M.S.)**

तार: " ज्ञानतीर्थ "
**स्वामी रामानंद तीर्थ**
**मराठवाडा विद्यापीठ**
*"ज्ञानतीर्थ", विष्णुपूरी,*
**नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)**



देण्यात येवू नये. त्यास फक्त दिर्घोत्तरी प्रश्नासाठी उत्तरपत्रिका देण्यात यावी. तसेच परीक्षा सुरु झाल्यानंतर तीस मिनटानंतर येणा–या विद्यार्थ्यांस परीक्षा दालनात प्रवेश देउ नयेत.

तसेच शैक्षणिक वर्ष २०१४–२०१५ पासून सर्व पदवी व पदव्युत्तर स्तरावर अभ्यासक्रमासाठी श्रेयांक CGPA व CBCS पध्दतीचा अवलंब करणे बाबत मा. अधिष्ठांताच्या संयुक्त बैठकीत ठराव मान्य झालेला आहे. या बाबत सविस्तर नियमावली शैक्षणीक विभागाकडुन सर्व महाविद्यालयास पुरविण्यात येईल तसेच या विषयी विद्यापीठामध्ये तज्ञाच्या मार्गदर्शनाखाली लवकरच कार्यशाळा घेण्यात येणार आहे.

सबब, उपरोक्त प्रमाणे महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करणे आपणास बंधनकारक आहे त्यामुळे कृपया ही बाब आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून द्यावी.

आपला

Sd/-

**परीक्षा नियंत्रक**

प्रत:
१) मा.कुलगुरु यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.संचालक,म.वि.वि.म.य,प्रस्तुत विद्यापीठ

Phone/फोन नं: (02462) 229294 / 229145 / 229543
Fax No./ फॅक्स नं: (02462) 229520
Web site : srtmun.ac.in

Gram: "Dnyanteerth"
**Swami Ramanand Teerth Marathwada University**
*"Dnyanteerth", Vishnupuri,*
**Nanded - 431 606 (M.S.)**

तार: 'ज्ञानतीर्थ'
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ**
*"ज्ञानतीर्थ", विष्णुपुरी,*
**नांदेड - 431 606 (महाराष्ट्र)**

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०१७–२०१८/१२६५ दिनांक: ०२.०८.२०१७

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था/
सर्व विभाग प्रमुख (शैक्षणिक संकुल) प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७–२०१८ मधील विविध परीक्षांची निर्धारीत वेळापत्रके, परीक्षा शुल्क, विलंब शुल्क, धनाकर्ष काढण्याच्या, परीक्षा आवेदन पत्र सादर करण्याच्या तारखा, परीक्षा विभागासंदर्भात विविध सुचना/नियम इत्यादीबाबत.....

महोदय,

प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी २०१७ व उन्हाळी २०१८ मध्ये होणा–या परीक्षेसाठी विहीत शुल्क, विलंब शुल्क, त्याचप्रमाणे आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा, परीक्षा प्रारंभ दिनांक, निकालाच्या संभावित तारखा, परीक्षा आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी पात्रता क्रमांक घेणे, विषयात बदल न करणे, प्रोजेक्ट/अंतर्गत गुण परीक्षेपूर्वी पाठविणे, अतिरिक्त गुणाचे प्रस्ताव पाठविण्याच्या तारखा, मूल्यांकनासंदर्भातील तक्रार निवारण आवेदनपत्र पाठविणे, दीक्षांत समारंभाचे आवेदनपत्र पाठविणे आदी माहिती या परिपत्रकात दिली आहे.

विशेष सूचना :

०१) परीक्षा शुल्काचा धनाकर्ष :

महाविद्यालयाने परीक्षा शुल्काचा धनाकर्ष "वित्त व लेखाधिकारी, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड." यांचे नावे काढावा. सदर धनाकर्ष काढण्याच्या तारखा सोबतच्या निर्धारित वेळापत्रकात दर्शविण्यात आलेल्या आहेत.

०२) उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र/प्रोव्हिजनल सर्टीफीकेट शुल्क परीक्षा शुल्कासोबत घेणे :

विद्यार्थ्यांना प्रोव्हिजनल सर्टीफीकेट/उत्तीर्णतेचे प्रमाणपत्रासाठी १००/१५० किलोमिटर हून रू. २००/३०० खर्च करून केवळ तेवढयाचसाठी विद्यापीठात यावे लागते विद्यार्थ्यांच्या पैशाचा व वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी उन्हाळी २००७ च्या परीक्षेपासून पदवी/पदव्युत्तर अंतिम

परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र/प्रोव्हिजनल सर्टीफीकेट निकालासोबत महाविद्यालयाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. उन्हाळी २०१७ मध्ये होणा—या परीक्षेसाठी महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांच्या प्रोव्हिजनल सर्टीफीकेटचे शुल्क रू. ७५/— विद्यार्थ्यांकडून घेवून ते परीक्षा शुल्कासोबत विद्यापीठात जमा करावे.

०३) "पर्यावरण अभ्यास" विषयाचे शुल्क परीक्षा शुल्कासोबत घेणे :

शैक्षणिक विभागाचे पत्र जा.क्र. शैक्षणिक/शा.आ./यु.जी.सी./इ.स्ट./शिक्षक/२००५—२००६/४१०४—४२८ दि. १३/०८/२००५ नुसार सर्व विद्याशाखा अंतिम वर्षाच्या नियमीत विद्यार्थ्यांना पर्यावरणशास्त्र या विषयासाठी विद्यार्थ्यांकडून रू १५०/— फीस आकारून त्यातील रू. १००/— हे शिक्षकाचे मानधन व मूल्यांकनासाठी खर्च करण्यात यावेत. उर्वरीत रू. ५०/— हे परीक्षेसाठी विद्यापीठाकडे वर्ग करण्यात यावेत. पर्यावरण अभ्यास या विषयात अनुत्तीर्ण होवून पून्हा परीक्षेस बसणा—या विद्यार्थ्यांकडून रू ५०/— शुल्क घेण्यात यावे व सदर शुल्क विद्यापीठाकडे वर्ग करावे.

०४) नियोजित तारखेस धनाकर्ष न काढल्यास आकारण्यात येणारा दंड :

नियोजित तारखेस धनाकर्ष न काढल्यास महाविद्यालयास नियोजित तारखेपासून दहा दिवसापर्यंत प्रतिदिन रू.५००/— व दहा दिवसानंतर ते धनाकर्ष काढलेल्या तारखेपर्यंत प्रतिदिन रू. १०००/— दंड आकारण्यात येईल.

०५) आवेदन पत्र दाखल करण्यास विलंब :

महाविद्यालयांनी परीक्षा शुल्काचा धनाकर्ष वेळेत काढुनही परीक्षा आवेदन पत्र व धनाकर्ष विहीत तारखेस विद्यापीठात सादर केले नाहीत तर महाविद्यालयास प्रति विद्यार्थी प्रति दिन रू.०२/— या प्रमाणे होणारी रक्कम किंवा रू. १०००/— यापेक्षा जे जास्त असेल तेवढा दंड भरावा लागेल.

आवेदनपत्र विहित मुदतीत दाखल करण्यास कांही तांत्रिक अडचण असेल तर परीक्षा विभागाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

०६) परीक्षा आवेदन पत्र सादर करण्यापूर्वी पात्रता विभागाकडून पात्रता मंजूर करून घेणे :

परीक्षा आवेदन पत्र सादर करताना पात्रता विभागाने मंजूर केलेला पात्रता क्रमांक परीक्षा आवेदनपत्रावर न लिहीताही विद्यार्थ्यास परीक्षेचे प्रवेशपत्र दिल्याने अशा विद्यार्थ्यांचे निकाल राखीव राहतात त्यासाठी महाविद्यालयास व परीक्षा विभागासही ऐनवेळी पात्रता क्रमांक मिळविण्यासाठी धावपळ करावी लागते. पर्यायाने महाविद्यालय व विद्यापीठ प्रशासनावर

विनाकारण कामाचा ताण पडतो. त्यामूळे २०१८ च्या उन्हाळी परीक्षेचे आवेदनपत्र सादर करतेवेळी आवेदनपत्रासोबत पात्रता विभागाने मंजूर केलेल्या पात्रता क्रमांकाची यादी जोडल्याशिवाय परीक्षा आवेदन पत्र स्विकारली जाणार नाहीत. यात कांही तांत्रीक अडचणी असल्यास परीक्षा नियंत्रकांची परवानगी घेणे आवश्यक राहील. पात्रता यादीत ज्या विद्यार्थ्यांच्या त्रुटी असतील त्यांची परीक्षा आवेदनपत्रे महाविद्यालयास परत पाठविण्यात येतील. महाविद्यालयाने अशी आवेदनपत्रे पात्रता क्रमांकातील त्रुटीची पूर्तता करून पात्रता क्रमांकासह पुन्हा सादर करावीत. पात्रता क्रमांकाअभावी राखीव असलेला निकाल विलंबाने जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना कोणत्याही सवलतीचा लाभ मिळणार नाही. उदा. परीक्षा आवेदनपत्रासाठी भरावा लागणारा दंड, उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत, गुणपडताळणी पुनर्मुल्यांकन, गुणवत्ता यादीसाठी इत्यादी.

०७) <u>ऑफीस व्हेरीफीकेशनसाठी राखीव असलेले निकाल – परीक्षा आवेदनपत्रे सादर करणे बाबत.</u>

ऑफीस व्हेरीफीकेशनसाठी (O.V.) राखीव असलेले निकाल जाहिर झाल्यानंतर संबंधीत विद्यार्थ्यास निकाल जाहिर झाल्यापासून १० दिवसापर्यंत परीक्षा आवेदनपत्र सादर करण्यासाठी अतिविलंब शुल्क आकारले जाणार नाही. त्यानंतर प्रतिदिन नियमानुसार रू.५०/– अतिविलंब शुल्क आकारले जाईल.

०८) <u>विषयात बदल न करणे</u> :

परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठात सादर केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्याने विषयात बदल करू नयेत परीक्षेच्या वेळी परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्याने विषयात बदल करून परीक्षा दिल्यास मुळ आवेदन पत्रात दर्शविलेल्या विषयात अनुपस्थिती दर्शवून निकाल जाहीर केला जाईल याबाबत कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही.

०९) <u>अंतर्गत गुण पाठविणे</u> :

बऱ्याच वेळेस अंतर्गत गुणांच्या याद्या या वेळेत येत नाहीत. याचा परिणाम त्या–त्या विषयाच्या निकालावर होत असून निकाल हे विलंबाने जाहिर होत आहेत. त्यामूळे दिनांक ०१ऑगस्ट २०१६ रोजी संपन्न झालेल्या मा.व्यवस्थापन परीषद बैठकीत यावर चर्चा होवून असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, जे महाविद्यालये हे अंतर्गत गुणांच्या याद्या या विद्यापीठाने ठरवून दिलेल्या वेळेच्या नंतर किंवा निकाल जाहीर झाल्यानंतर सादर करतील त्यांना प्रती विद्यार्थी रू. २००/– व जास्तीत जास्त रू. १००००/– तर अंतर्गत गुण/प्रकल्पकार्य यात निकालानंतर दुरूस्ती सुचविल्यास रू. ३००/– प्रती विद्यार्थी व प्रकल्पकार्य गुण निकाल जाहिर झाल्यानंतर सादर केल्यास प्रती विद्यार्थी रू. ५००/– विलंब शुल्क आकारले जाईल.

तसेच अंतर्गत गुणयाद्या बाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नविन प्रपत्र देण्यात आलेले असून त्यामध्ये सर्व विषयाचे एकत्रित गुण दर्शवून त्यावर संबंधित विषय शिक्षक व प्राचार्यांनी

स्वाक्षरी करून विद्यापीठात सादर कराव्यात. जे महाविद्यालये निकाल घोषित होईपर्यंत सुध्दा अंतर्गत गुणयाद्या सादर करणार नाहीत त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अंतर्गत ० गुण दर्शवून निकाल घोषित केला जाईल.

१०) <u>अभ्यासेत्तर व अभ्यासपूरक उपक्रमात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त ५ गुण :</u>

पदवी स्तरावर ५ गुण अतिरिक्त देणे बाबत प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक शैक्षणिक–०१/अतिरिक्त गुण/९८–९९/२३९–३६३, दिनांक २२–०६–१९९८ नूसार अभ्यासेत्तर व अभ्यासपूरक उपक्रमांत सहभागी असलेल्या उन्हाळी २०१८ मध्ये होणा–या पदवी अंतिम परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची यादी विहित नमुन्यात अचूक भरून योग्य त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतीसह विद्यापीठातील संबंधित विभागाकडे <u>(राष्ट्रीय सेवा योजना/ विद्यार्थी कल्याण/क्रीडा संचालक)</u>**<u>दिनांक ३० मार्च २०१८ पर्यंत</u>** सादर करावीत. महाविद्यालयाने **<u>असे प्रस्ताव सरळ परीक्षा विभागास पाठवू नयेत</u>** संबंधित विभागाने ही यादी प्रमाणित करून परीक्षा विभागास दिनांक २० एप्रिल २०१८ पर्यंत सादर करावयाची आहे. राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एन.सी.सी.) विद्यार्थ्यांचे अतिरिक्त गुणासाठीचे प्रस्ताव परीक्षा विभागात दिनांक २०/०४/२०१८ पर्यंत सादर करावेत. **<u>असे प्रस्ताव महाविद्यालयाने विहित मुदतीत सादर न केल्यास महाविद्यालयास प्रति विद्यार्थी रू १०००/– दंड आकारून निकाल देण्यात येईल. मात्र असे प्रस्ताव निकालानंतर एक महिन्यापर्यंतच सादर करता येतील त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत याचा लाभ मिळणार नाही.</u>**

त्यामुळे महाविद्यालयांनी असे प्रस्ताव ३१ मार्च पूर्वीच (एन.सी.सी. चे २०.०४.२०१८ पूर्वी) पाठवावेत ही बाब विद्यार्थी व आपल्या महाविद्यालयातील संबंधीतांच्या निदर्शनास आणून दयावी.

११) <u>गैरवर्तणूक केलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिका (एम.पी.केसेसचे बंडल) वेळेत पाठविणे बाबत :</u>

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या एम.पी.केसेसचे सर्व बंडल्स त्या त्या केंद्रावरील परीक्षा संपल्यानंतर सात दिवसात प्रशासकीय कर्मचाऱ्यासोबत पाठवावेत. त्यानंतर पाठविलेले बंडल्स घेवून येणाऱ्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधीस प्रवास व दैनंदीन भत्ता (टि.ए.डी.ए.) देय रहाणार नाही शिवाय ४८(५)(अ) समितीच्या बैठकीच्या नियोजनापूर्वी असे बंडल्स प्राप्त न झाल्यामुळे संबंधीत विद्यार्थ्यांना वेळेत पत्र गेले नाहीत किंवा अशा विद्यार्थ्यांचा निकाल राखीव राहिला तर त्याची व ४८(५)(अ) समितीच्या खास बैठकीच्या खर्चाची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील. तसेच महाविद्यालयास रू. ५०००/– विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१२) <u>उत्तरपत्रिकांच्या छायाकिंत प्रती (फोटो कॉपीज) व मूल्यांकना संदर्भातील तक्रार निवारण पध्दती</u> :

उत्तरपत्रिकांची स्कुटनी/व्हेरीफीकेशन व फोटो कॉपीज (फार्म ए) आणि मूल्यांकना संदर्भातील तक्रार निवारण पध्दती (फार्म बी) संदर्भात विद्यापीठाने स्वतंत्र छापील आवेदन पत्र तयार केलेले असून ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ते डाउनलोड करून घेवून

सादर करावेत त्याचे शुल्क रू. १०/— प्रमाणे विद्यापीठाच्या लेखा विभागात भरून पावती सादर करणे आवश्यक आहे. रिकाउंटींगची पध्दत बंद झालेली असून स्कुटनी/व्हेरीफीकेशनसाठी तयार करण्यात आलेल्या छापील आवेदनपत्रावरच विद्यार्थ्यांनी अर्ज करणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी त्यांच्याकडे असलेले जूने रिकाउंटींगचे फॉर्म यासाठी वापरू नयेत. तसेच मा.परीक्षा मंडळाच्या निर्णयानूसार विद्यार्थ्यांस थेट पूनर्मुल्यांकन किंवा फोटो कॉपीज या पैकी कोणतीही एकच सुविधा देण्यात येईल.

१३) परीक्षा आवेदनपत्र व विविध छापील फॉर्म्स संकेत स्थळावर उपलब्ध असले बाबत :

विविध छापील फॉर्म्स विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. संकेत स्थळावरून हे फार्म्स डाउन लोड करून घेता येतील. संकेत स्थळावरून डाउन लोड करून घेतलेले परीक्षा आवेदन पत्र, स्क्रुटीनी/व्हेरिफीकेशन/फोटो कॉपीज /फेरमूल्यांकन/मायग्रेशन/दीक्षांत इत्यादी आवेदनपत्रांची विहीत शुल्क भरणे आवश्यक आहे.

१४) प्रमाणपत्राच्या द्वितीय प्रती बाबत.

अ) गुणपत्रीकेच्या द्वितीय प्रतीसाठी :— (१) निर्धारित शुल्क रू. १००/— (२) विद्यार्थ्याचा अर्ज (३) चालू वर्षाच्या परीक्षेतील गुणपत्रीकेच्या द्वितीय प्रतीसाठी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्याचे पत्र आवश्यक आहे.

ब) स्थलांतर प्रमाणपत्राच्या द्वितीय प्रतीसाठी :— (१) निर्धारित शुल्क रू. १०००/— (२) विहीत नमुन्यातील परीपूर्ण अर्ज (३) रू.५०/— च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र (४) गुणपत्रकाच्या सत्यप्रती

क) उत्तीर्णता प्रमाणपत्र व्दितीय प्रत:—(१) निर्धारित शुल्क रू. १५०/— (२) विद्यार्थ्याचा विनंती अर्ज.

१५) दीक्षांत समारंभाचे आवेदनपत्र महाविद्यालयात स्विकारणे :

जानेवारी/फेब्रुवारी—२०१८मध्ये होणाऱ्या दीक्षांत समारंभासाठीचे आवेदन पत्र (Convocation Forms) संबधीत परीक्षा आवेदन पत्रासोबतच सादर करून घेण्यात आलेले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी हे आवेदनपत्र सादर केले नसतील त्यांनी विहित शुल्कासह ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर दरम्यान व रू. ५०/— विलंब शुल्कासह ०१ आक्टोबर ते १५ आक्टोबर दरम्यान महाविद्यालयात स्विकारावेत व असे आवेदनपत्र विहीत शुल्काच्या धनाकर्षासह विद्यापीठात जमा करावेत. यासाठीचे वेळापत्रक स्वतंत्रपणे पाठविण्यात येईल.

१६) परीक्षार्थी संख्या दर्शविणारा तक्ता परीक्षा आवेदन पत्रासोबत सादर करणे बाबत.

विविध महाविद्यालयास परीक्षा केंद्र देण्यापूर्वी संबंधीत महाविद्यालयातील परीक्षा दालन व फर्निचर याची माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी परीक्षा आवेदन पत्र सादर करतेवेळी आपल्या महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर व व्यावसायीक अभ्यासक्रमाची विद्याशाखानिहाय व वर्गनिहाय परीक्षार्थी संख्या आणि उपलब्ध परीक्षा दालन व फर्निचर इत्यादीची माहिती यासोबत

जोडलेल्या शेवटच्या पानावर दर्शविलेल्या तक्त्यात भरून देण्यात यावी त्याशिवाय परीक्षा आवेदन पत्र स्विकारली जाणार नाहीत.

१७) <u>उपस्थिती/ अनुपस्थिती बाबत.</u>

अंतर्गत, मौखिक, टर्मवर्क, प्रकल्प, प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या उपस्थिती अहवालात एखादया विद्यार्थ्याची उपस्थिती दिसुन न आल्यास अशा विद्यार्थ्याचा निकाल अनुपस्थिती दर्शवून जाहिर केला जाईल. तथापि विद्यार्थी/महविद्यालयाने योग्य तो पुरावा व अभिलेख सादर केल्यास निकाल दुरूस्त करून दिला जाईल. ही दुरूस्ती कोणत्याही परीस्थीतीत परीक्षा झाल्यापासून सहा महिण्यानंतर करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१८) <u>अंतर्गत गुण पाठविण्यासाठीच्या नमुना बाबत.</u>

अंतर्गत गुण विद्यापीठात पाठविण्यासाठीच्या विहीत नमुण्यात गुण यादी तयार करून अंतर्गत गुण विद्यापीठात सादर करावेत. अंतर्गत गुणयाद्या बंद पॉकीटात महाविद्यालयाच्या कर्मचा–यासोबतच पाठवावे. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना गुणयादी देवून पाठविण्यात येवू नये.

वरील सर्व बाबी विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व सर्व संबंधीताच्या निदर्शनास आणून द्याव्यात, ही विनंती.

स्वा/–
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :

१. मा. कुलपती यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
३. मा. अवर सचिव, केंद्रीय लोकसेवा आयोग, ढोलपूर हाउस, नवी दिल्ली.
४. मा. सचिव, शिक्षण मंत्रालय (उच्च शिक्षण) मुंबई.
५. मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
६. मा. सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड
७. मा. सह संचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, औरंगाबाद.
८. मा. सचिव, म.रा. उच्च व माध्यमिक परीक्षा मंडळ, लातूर विभाग/औरंगाबाद विभाग.
९. मा. परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठे.
१०. मा. कुलगुरु सचिवालय, प्रस्तुत विद्यापीठ.
११. मा. प्र.कुलगुरू सचिवालय, प्रस्तुत विद्यापीठ.
१२. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
१३. मा. संचालक, महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
१४. मा. विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग व सर्व संकुल प्रमुख, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.
१५. मा.समन्वयक, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, उप–केंद्र, लातूर

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

## Services provided to Students by Examination Department & its duration

### Templete

| Sr.No. | Types of Services | Required Documents | Period Required |
|---|---|---|---|
| 1 | Passing Certificate | 01.Application on plain paper<br>02.Photocopies of all Marksmemo<br>03.Prescribed Fees Rs. 75/- | 1 to 5 Days |
| 2 | Migration Certificate | 01.Application in the prescribed Form<br>02.T.C. for Migration<br>03.Photocopy of Marksmemo of Final Year OR<br>04.Eligibility Number given by Eligibility Section.<br>05.Fees Rs.200/- By post Rs.250/- | 1 to 5 Days |
| 03 | Transcript Certificate | 01.Application on plain paper<br>02.Photocopies of Marksmemo<br>03.Prescribed Fees Rs.500/-<br>(Non Professional course)<br>Rs.200/- for each additional copy<br>Rs.1000/- for Professional Course<br>Rs.500/- for each additional copy | 1 to 5 Days |
| 04 | Duplicate copy of Marksmemo | 01.Application on plain paper showing Exam Seat Number & year of Examination<br>02.In case of recent exam Principals Letter<br>03.Prescribed Fees Rs.100/- | 1 to 5 Days |

F:\Jiglekar

| Sr.No. | Types of Services | Required Documents | Period Required |
|---|---|---|---|
| 05 | Duplicate copy of Passing & Migration Certificate | 01.Application on plain paper<br>02.Prescribed Fees<br>- Passing Certificate Rs.150/-<br>- Migration Certificate Rs.1000/-<br>- Affidavit on Rs.100/- Bond Paper for Duplicate Migration certificate only | 2 to 5 Days |
| 06 | Degree Certificate | 01.Application in the prescribed Form<br>02.Photocopies of all Marksmemo<br>03.Fees : In Presentia Rs.150/- +Rs.50/- Late fees per year<br>In Absencea Rs.200/- (by Post)<br>Rs.50/- late fees per year (Maximum Rs.500/-) | In the Convocation or through by Post 15 days |
| 07 | Duplicate copy of Degree Certificate | 01.Application in the prescribed Form<br>02.Attested copy on Final year marksmemo<br>03.An Affidavit of Rs.100/- Bond Paper<br>04.Copy of advertisement given in Newspaper & F I R submitted in Police Station<br>05.Prescribed Fees Rs.500/- | 15 Days |
| 08 | Correction in Marksmemo | 01.Application on plain paper<br>02.Eligibility Section Letter<br>03.Last year marksmemo<br>04.Original marksmemo in respect of correction<br>05.Fees Rs.100/-<br>(No fees for 40 days from declaration of Result) | 5 to 8 Days |

F:\Jiglekar

| Sr.No. | Types of Services | Required Documents | Period Required |
|---|---|---|---|
| 09 | Merit Certificate | Application on plain paper | 1 Day |
| 10 | 'R' clearance on marksmemo | 01. Letter from Principal<br>02. Original marksmemo of 'R' result<br>03. Photocopy of last year marksmemo<br>04. Fees: Rs.100/- | 1 to 5 Days |
| 11 | Photocopy of Answer book & Verification | 01. Application in the prescribed Form<br>02. Photocopy of marksmemo<br>03. Fees : Rs.350/- for Non Professional Courses<br>Rs.400/- for Professional Courses<br>04. Application should be submitted in College | Within 30 days from the receipt of application |
| 12 | Revaluation | 01. Application in the prescribed Form<br>02. Photocopy of marksmemo<br>03. Fees : Rs.150/- if obtained photocopy of Answer book<br>Rs.350/- if photocopy is not required (Direct Revaluation)<br>**(Revaluation facility available only for Two subjects in each Semester)**<br>04. Application should be submitted in College | Within 30 days from date of issue of Photocopy |
| 13 | Other Certificates | Rs.200/- | 1 to 5 Days |
| 14 | Document Verification | Rs.1000/- | 1 to 5 Days |

01. For above services students has to submit application with required documents & pay the prescribed fees in Account Section of this University.
02. If the students submittes his application along with the required fees in the Morning Session then he will get all concern certificates same day at 05:00 pm.
03. Examination Department shall not be responsible for any postal delay
04. If there is any complain regarding above services please meet to Assistant Registrar, Deputy Registrar Exam Section or Controller of Examinations.

***Controller of Examinations***

F:\Jiglekar

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड – ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Reaccredited with 'A' Grade

**Office of the Controller of Examinations**

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com

संदर्भ: परिक्षा/२०१५-१६/४४९९ दि. ०८.०६.२०१६

प्रति,
मा.प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:- परीक्षा विषयक विद्यार्थी तक्रार निवारणाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उन्हाळी-२०१६ परीक्षेच्या अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर झालेले आहेत तर काही अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात येत आहेत. सदर निकालापैकी काही विद्यार्थ्यांचे निकाल खालील बाबींमुळे निकाल राखीव ठरतात.

उत्तरपुस्तिकेवरील नोंदविलेला बैठक क्रमांक उपस्थिती अहवालासोबत न जोडणे, चुकीचा बैठक क्रमांक नोंदविणे, अंतर्गत तथा प्रात्यक्षिक गुण अप्राप्त असल्यामुळे, पात्रता क्रमांकासाठी राखीव असणे, परीक्षेतील गैरवर्तणूकीमुळे निकाल राखीव असणे इत्यादी. तसेच विद्यार्थी गुण कमी प्राप्त झाले किंवा अनुत्तीर्ण झाले याही तक्रारी प्राप्त होतात. अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठात न पाठवता, पुर्नमुल्यांकन किंवा उत्तरपुस्तिकेची झेरॉक्स घेणेबाबत कळवावे.

उपरोक्त कारणांसाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठात न पाठवता महाविद्यालयस्तरावर त्यांना समुपदेशन/मार्गदर्शन करावे. अशा विद्यार्थ्यांचे सर्व प्रकरणे योग्य त्या कागदपत्रांच्या पुर्ततेसह महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत परीक्षा विभागात सादर केल्यास सोईचे होईल. यामुळे परीक्षा विभागात अनावश्यक गर्दी कमी होईल व कामाचा अतिरिक्त ताण कमी होईल.

परीक्षा विभागामार्फत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणा-या सेवा व त्यांचे शुल्क, आवश्यक कागदपत्रे व कालावधी याचे सविस्तर विवरण विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याची प्रत महाविद्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात यावी.

परीक्षा विभागामार्फत लवकरच एक खिडकी योजना कार्यान्वयित करण्यात येणार असून ही बाब सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. जे महाविद्यालये वरीलप्रमाणे विद्यार्थी तक्रार निवारण करणार नाहीत अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची कोणतीही बाब परीक्षा विभागामार्फत ऐकुण घेतली जाणार नाही व विद्यार्थ्यांच्या होणा-या गैरसोईसाठी महाविद्यालय प्रशासन जबाबदार असेल.

कळावे,

आपला,

परीक्षा नियंत्रक

F:\Jiglekar\Correspondence

॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

" ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteerth" Vishnupuri, Nanded – 431 606, (Maharashtra)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/S 2(f) and 12 (B) NAAC Re-accredited with "A" Grade

DEPARTMENT OF EXAMINATION (ELLIGIBILITY SECTION)

Phone : ( 02462 ) 229 242, 229 243

Website : srtmun.ac.in

संदर्भ : पात्रता/२०१९–२०/ 125 दिनांक ३०/०६/२०१९

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड.

विषय :– आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :– मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक २३ जून २०१७ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार राज्यातील मान्यताप्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क योजनेंतर्गत लाभ देण्याकरीता पात्रतेसाठी कुटुंबाची वार्षिक आर्थिक मर्यादा रु. ६.०० लक्ष करण्यात आल्याचे कळविले असून विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यापासून वंचित ठेवण्यात येऊ नये तसेच ईबीसी सवलती व इतर बाबींचा सदर पत्रामध्ये उल्लेख केला आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्र सोबत जोडण्यात आले असून सदर पत्रानुसार आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



## Office of the Controller of Examinations

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com

जा.क्र.पनिका/भ्रमनध्वनीप्रतिबंध/हिवाळी१६परीक्षा/२०१६-१७/४७२ दि. २२/१०/२०१६.

**परिपत्रक**

प्रति,
**मा. प्राचार्य तथा केंद्रप्रमुख**
सर्व संलग्नीत महाविद्यालये/परीक्षा केंद्रे
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : परीक्षा हॉलमध्ये परीक्षार्थीकडे भ्रमणध्वनी/मोबाईल आढळुन आल्यास संपूर्ण संपादणूक रद्द (W.P.C.) करणे बाबत.**

महोदय,

वरील विषयी सर्व केंद्र प्रमुख, सहकेंद्रप्रमुख, प्राचार्य,सहाय्यक केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, मा.परीक्षा मंडळाच्या ठरावानुसार परीक्षा हॉलमध्ये कोणत्याही परीक्षार्थीस भ्रमणध्वनी/मोबाईल फोन बाळगण्यास/वापरण्यास परवानगी देण्यात येवु नये असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

या निर्णयानुसार परीक्षा केंद्रावरील हॉलमध्ये प्रवेश करतांना सर्व परीक्षार्थ्यांची तपासणी करावी, कोणत्याही परीक्षार्थ्यांकडे मोबाईल/भ्रमणध्वनी असल्याचे आढळुन आल्यास तो त्वरीत काढुन घ्यावा, अशा परीक्षार्थ्यांस कोणत्याही परिस्थीतीत परीक्षेत मोबाईल बाळगण्यास/वापरण्यास परवानगी देण्यात येवु नये. परीक्षा चालु असतांना कोणत्याही परीक्षार्थ्यांकडे मोबाईल/भ्रमनध्वनी आढळुन आल्यास सदर परीक्षार्थ्यांस W.P.C.(सर्व संपादणूक रद्द) करण्यात यावे.

वरील बाबींचा गांभीर्याने नोंद घेवुन हि बाब सर्व परीक्षार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी व कोणत्याही परीक्षार्थ्यांकडे मोबाईल/भ्रमनध्वनी नसल्याची खात्री करुन घ्यावी. परीक्षा चालु असतांना परीक्षार्थ्यांकडे मोबाईल आढळुन आल्यास तो जप्त करुन त्या मोबाईलच्या तपशिलाची नोंद करावी व परीक्षा केंद्र प्रमुख/सहकेंद्रप्रमुख/सहाय्यक केंद्रप्रमुख व पर्यवेक्षक यांचे समक्ष या बाबीची नोंद करुन त्या परीक्षार्थ्यांची उत्तरपुस्तीका व मोबाईलसह परीक्षेतील गैरप्रकार (M.P. Case) म्हणुन पुढील कार्यवाहीस्तव परीक्षा विभागाकडे खास दुतामार्फत पाठविण्याची कार्यवाही करावी.

कळावे,

आपला,
**परीक्षा नियंत्रक**

**प्रत माहितीस्तव :**
मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.